# ।। हद गुरू पारख को अंग ।।
# मारवाडी + मराठी
# सत्संग

महत्वाची सुचना:– रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

✻ वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

।। अथ हद गुरू पारख को अंग लिखंते ।।

हदका गुरू सुखराम क्हे ।। सुणज्यो ईण अेनाण ।।
क्रिया करणी ध्रमरे ।। भ्रम द्रढावे आण ।।१।।

हद्दचे गुरु म्हणजे काळाच्या मुखात ठेवणारे गुरु म्हणजेच काळाच्या मुखातून न काढणारे गुरु म्हणजेच महाप्रलयात नष्ट होणारे आकाशापर्यंत पोहचविणारे गुरु त्यांचे ज्ञान,ध्यानाचे चिन्ह काय आहे हे सर्व स्त्री-पुरुषांनो समजा असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व स्त्री-पुरुषांना सांगत आहेत हे गुरु ब्रम्हा,विष्णु महादेव, शक्ती,रामचंद्र,कृष्ण इत्यादी जे हद्दीमध्ये राहतात म्हणजे काळाच्या मुखात राहतात त्यांच्या सारखे सुख प्राप्त करण्याच्या करण्या तसेच धर्म सांगतात व त्याच्यात लावतात ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्ती,अवतार यांच्या करण्यांमध्ये तसेच धर्मात काळा-पासून मुक्त होण्याची विधि आहे हे शिष्याच्या मनात भ्रम पक्का करतात.।।१।।

नांव बिना म्हेमा करे ।। सो हद का गुरू होय ।।
सुणज्यो सब सुखराम कहे ।। क्या सांगी क्यां लोय ।।२।।

सतस्वरुपाच्या नामा शिवाय त्रिगुणी मायेच्या करण्या व धर्माची महिमा करतात हे हद्दीचे गुरु आहेत म्हणजे काळाच्या मुखात बसलेले गुरु आहेत हे वेषधारी असो किंवा गृहस्थी असो सर्व हद्दचे गुरु आहेत म्हणजे काळाचा चारा आहे.।।२।।

जप तप तीरथ जिग की ।। सोभा करे बणाय ।।
हद गुरू सो सुखराम के ।। पढे पढावे आय ।।३।।

हे हद्दीचे गुरु ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्ती,अवतार इत्यादीचे जप,तीर्थ,तसेच यज्ञ इत्यादीची शोभा शिष्यांजवळ बनवून बनवून वर्णन करतात.हे जप,तीर्थ,यज्ञाची विधि स्वत:ही शिकतात व शिष्यांनाही शिकवतात. ।।३।।

मंत्र देवे सिष कूं ।। पांच सुणावे नांव ।।
सो रेवे सुखराम के ।। हद के ऊले गाँव ।।४।।

शिष्याच्या कानात मंत्र देऊन पाच नाम सांगतात असे गुरु आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात हद्दीचे आहेत हे गुरु काळ खातो अशा आकाशाच्या आधीच्या गावाला पोहचणारे आहेत. ।।४।।

तारक मंत्र देत हे ।। फेर तुळछीको आय ।।
सो गुरू हद का जाणीये ।। सुखदेव कहे बजाय ।।५।।

ऊँ नम: सत्य रामाय चिदानंदैक मुर्त ये प्रत्यक्ष तत्व बोधाय गुरु बेदोक्त लब्धते हा शिष्याला तारक मंत्र देतात सोबत तुळशीचा मंत्र देतात.आदि सतगुरु सुखरामजी महाराज प्रत्येक स्त्री-पुरुषाला बजावून बजावून समजवत आहेत की,हे सर्व गुरु हद्दीचे

आहेत हे जाणा.काळाच्या मुखात वास करणारे आहेत. ।।५।।

**सुरगण सेवा बंदगी ।। ले माळा सूं नांव ।।**
**सुखदेव सो गुरू हद का ।। सुणज्यो रे सब गाँव ।।६।।**

जे गुरु सगुण म्हणजे ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्ती इत्यादी देवतांची तसेच अवतारांच्या मूर्त्यांची पूजा करतात तसेच त्यांच्या माळा घेऊन घेऊन जप करतात हे सर्व गुरु हद्द म्हणजे काळाच्या जबड्यात बसले आहेत असे आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी सर्व गावातील स्त्री-पुरुषांना सतस्वरुप ज्ञानाने समजण्यास सांगितले.।।६।।

**सांख जोग हर भक्त को ।। मत मंतर दे आण ।।**
**सो गुरू सब ही हद का ।। सुखदेव कहे बखाण ।।७।।**

जे गुरु सांख्ययोगाचा मंत्र शिकवितात,सांख्ययोगाच्या आधारावर हर ब्रम्हचा भेद देतात ते सर्व गुरु हद्दीचे म्हणजे काळाच्या मुखात बसले आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज वर्णन करुन राहिले.।।७।।

**साधन क्रिया अटकना ।। नेम बतावे कोय ।।**
**सो गुरू सुखरामके ।। सब ही हद का होय ।।८।।**

जे गुरु योगाभ्यासाची साधना सांगतात नेती,धोती,बस्ती,कपाली इत्यादी क्रिया सांगतात आणि ही विधि करा ही विधि करु नका अशा अनेक गोष्टींनी शिष्याला अटकाव करतात.शिष्याला अहिंसा,सत्य,अस्तेय,ब्रम्हचर्य,अपरिग्रह,शौर्य,संतोष, तप, स्वाध्याय,ईश्वर,प्राणीधान असे दहा नियम शिकवतात हे सर्व हद्दीचे गुरु आहेत म्हणजे शिष्याला काळाच्या जबड्यात पोहचविणारे गुरु आहेत हे समजा असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व स्त्री-पुरुषांना बोलले.।।८।।

**कुंची देवे जोग की ।। देवे पवन गढ चाड ।।**
**सो गुरू ही सुखराम के ।। जद तद हद का झाड ।।९।।**

योगाभ्यासाची किल्ली देतात व शिष्याला भृगुटी गडावर चढवून देतात ते गुरु हद्दीमध्ये पोहचविणारेच आहेत असे आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी जतविले.।।९।।

**तीन लोक च्यारूं दिसा ।। कर मे देत दिखाय ।।**
**वेई गुरू हे हद का ।। सुखदेव कहे बजाय ।।१०।।**

पृथ्वीलोक,पाताळलोक,स्वर्गलोक चारी दिशा(म्हणजे कोणतीही कसर न ठेवता)हातावर (तळहातावर)दाखवून देतात ते ही गुरु हद्दीचेच आहेत.म्हणजे शिष्याला काळाच्या मुखात ठेवणारेच आहेत असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज वाजवून समजवून राहिले.।।१०।।

**मन की बातां सब कहे ।। दे चावे सो आण ।।**

प्रमातम के भेद बिना ।। सुखदेव अे हद गुरू जाण ।।११।।

शिष्याच्या मनातील गोष्ट सर्व सांगतात व त्यांना जी पाहिजे ती वस्तू सिध्दाईने प्राप्त करुन देतात हे सर्व गुरु हद्दीचे गुरु आहेत हे जाणा परमात्म्याच्या भेदा शिवाय जे ही गुरु सृष्टीत आहेत ते काळाच्या मुखात स्वत: फसले आहेत व शिष्याला फसवितात. ।।११।।

सरगुण निरगुण ज्ञान रे ।। पडतां ओड न कोय ।।
आतम तत्त के भेद बिना ।। सुखदेव अे हद गुरू होय ।।१२।।

सगुण म्हणजे ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्ती,अवतार इत्यादींचे ज्ञान तसेच पारब्रम्ह निर्गुणचे ज्ञान शिकविण्यात अंतच येत नाही ते सर्व गुरु हद्दीचे आहेत हे जाणा या जगात आत्म्यात परमात्मा आहे हे तत्त प्रगट करुन देणारे भेदा शिवाय सर्व हद्दीचे गुरु आहेत हे जाणा असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व स्त्री–पुरुषांना बोलले. ।।१२।।

हद बेहद की बात रे ।। सिख सुणावे आण ।।
सो गुरू तो सुखराम के ।। सब ही हद का जाण ।।१३।।

हद्द म्हणजे ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्ती व अवतारांची गोष्ट तसेच बेहद म्हणजे पारब्रम्हची गोष्ट शिकतात व स्त्री–पुरुषांना शिकवतात असे सर्व गुरु हद्द म्हणजे काळाच्या मुखात फसले आहेत हे जाणा असे आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी जतवले.।।१३।।

अेक पलक के माहे रे ।। तीन लोक फिर जाय ।।
सुखदेव पद बिन चीनीया ।। सब गुरू हे हद माय ।।१४।।

एका पळात पृथ्वीलोक,पाताळलोक व स्वर्गलोक फिरुन येऊन जातात असे गुरु ही हद्द म्हणजे काळाच्या जबड्यात बसले आहे असे समजा.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व स्त्री–पुरुषांना बोलले की काळाच्या पलिकडील अमरपद प्राप्त केले नाही ते सर्व गुरु व शिष्य हद्दीमध्ये म्हणजे काळाच्या मुखात बसले आहे हे जाणा. ।।१४।।

धर अमंर कूं भान के ।। फेर नर थापे कोय ।।
सुखदेव पद के भेद बिन ।। सो हद का गुरू होय ।।१५।।

धरती,आकाशाला भंग करुन धरती व आकाशाची जशी तशी स्थापन करतात असे भंग करुन परत स्थापना करणारे गुरु हद्द म्हणजे काळाच्या जबड्यातच बसले आहे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले सतस्वरुप पदाच्या पोहच शिवाय सर्व गुरु हद्दीचे गुरु आहेत. काळाचा चारा आहे.।।१५।।

तीन लोक का अरथ रे ।। काडे ब्हो बिध जोय ।।

।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

चोथे पद बिन जाणीया ।। सुखदेव हद गुरू होय ।।१६।।

तीन लोकाचे ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्ती,अवतार इत्यादींच्या ज्ञानाने स्त्री–पुरुषांना भारी भारी विधी विधीने शकूनादिक सांगतात ते सर्व गुरु हद्दीचे आहेत आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले मृत्युलोक पाताळलोक,स्वर्गलोकाच्या पलिकडील आनंदलोक हे चौथे पद त्याचे ज्ञान जो जाणत नाही व मृत्युलोक,पाताळलोक, स्वर्गलोक या तीन पदाचे ज्ञान तऱ्हेतऱ्हेने जाणतात ते सर्व हद्दीचे गुरु आहे म्हणजे काळाच्या तावडीत पक्के फसलेले गुरु आहेत. ।।१६।।

आतम मे प्रमात्मा ।। आ गत लखे न कोय ।।
तब लग सुण सुखराम के ।। सब हद का गुरू होय ।।१७।।

आत्म्यात परमात्मा आहे ही गती जाणली नाही तोपर्यंत ते सर्व गुरु हद्दीचे म्हणजे काळाच्या जबड्यात फसलेले गुरु आहेत असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले. ।।१७।।

करामात करतूत रे ।। ब्होत सिधाई माय ।।
जन सुखदेव गढ ना चडया ।। तो हद का गुरू कहाय ।।१८।।

अशाप्रकारे अनेक प्रकाराने करामती आहे.कतृत्ववान आहे,सिध्दाईंनी ओतप्रोत भरले आहेत परंतु सतस्वरुप गडावर चढले नाही ते सर्व गुरु हद्दीचे म्हणजे काळाच्या जबड्यात अडकलेले आहेत. ।।१८।।

द्वादस कंवळ न छेदीया ।। इण काया मे जोय ।।
जब लग सुण सुखराम के ।। सब हद का गुरू होय ।।१९।।

या कायेत पूर्वेचे सहा कंठकमळ,हृदयकमळ,मध्यकमळ,नाभी कमळ,लींग स्थान व गुदाघाट तसेच पश्चिमचे सहा बंकनाळ,मेरुस्थान,त्रिगुटी,चिदानंदब्रम्ह,शिवब्रम्ह,पारब्रम्ह कमळ छेदन करुन सतस्वरुप गडावर पोहचले नाही तोपर्यंतचे सर्व मायेत प्रविणहून प्रविण गुरु हद्दीचे म्हणजे काळाच्या मुखात बसले आहेत हे समजा असे आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी सर्व स्त्री –पुरुषांना जतविले.।।१९।।

पूरब दिस भ्रुगुटी चडे ।। षट कंवल कूं जोय ।।
वेही गुरू सुखराम क्हे ।। सुण हद ही का होय ।।२०।।

जे पूर्व दिशेने(संखनाळेने मूलद्वाराने चढत चढत)भृगुटीत जातात आणि मधले सहाही कमळ पाहून घेतात ते गुरु ही आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,हद्दीचेच आहे असे पहा. ।।२०।।

बारी द्वादस ऊपरे ।। जब लग खोली नाय ।।
तब लग सुण सुखराम केहे ।। सब गुरू हद के माय ।।२१।।

।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

ज्याने बारा(कमळांच्या वरची)खिडकी जोपर्यंत उघडली नाही तोपर्यंत हे सर्व गुरु हद्दी मध्येच(इकडचेच)आहेत. ।।२१।।

**लाख बात की बात या ।। सुणज्यो रे सब कोय ।।**
**सुखदेव निर्गुण भेद बिन ।। सब हद का गुरू होय ।।२२।।**

मी तुम्हाला लक्ष गोष्टींची एक गोष्ट सांगतो हे तुम्ही सर्व ऐका सतस्वरुप निर्गुणच्या भेदा शिवाय सर्व हद्दीचे म्हणजे काळाच्या जबड्यात अटकलेले गुरु आहेत असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले.।।२२।।

**षट द्रशण गुरू हदका ।। बेरागी सब लोय ।।**
**सतगुरू तो सुखराम के ।। सब सूं न्यारा होय ।।२३।।**

योगी,जंगम,सेवडा,सन्यासी,फकीर,ब्राम्हण हे सर्व सहा दर्शनी तसेच जगातील सर्व प्रकारचे वैरागी हद्दीचे गुरु आहेत.हद्दीच्या पलिकडील सतगुरु या सर्वांपेक्षा वेगळे राहतात असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले.।।२३।।

**षट द्रशण गुरू देह का ।। सुण लीज्यो सब कोय ।।**
**सुखिया गुण फळ देत हे ।। हदका हद मे होय ।।२४।।**

षटदर्शन हे गुरु जीवाचे नसतात(हे गुरु देहाचे असतात हे सर्व ऐकू घ्या हे गुरु जास्तीत जास्त विष्णु लोकाच्या देहापर्यंतचे सुख देतात.हे विष्णुलोक सहीत सर्व लोकांना महाप्रलयात काळ खातो.आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले जास्तीत जास्त पलिकडील अमरपदाचे अमर देहाचे फळ मिळत नाही हे सर्व लोक ऐकून घ्या. ।।२४।।

**बेरागी गुरू भेष का ।। जोसी पाड़े नांव ।।**
**बिद्या का गुरू सेवड़ा ।। आराका गुरू गांव ।।२५।।**

वैरागी गुरु शिष्याला आपला वैरागी वेष देण्याचे गुरु आहेत.जोशी जन्मल्यानंतर देहाचे नाव ठेवणारे गुरु आहे.सेवडा पाच इंद्रियांचे सुख त्यागन्याची विधी शिकविणारे गुरु आहेत आरा म्हणजे बारव्यावर कसे करायचे हे गावाचा हुशार,शहाणा पुरुष सांगतो. अशाप्रकारे हा हुशार पुरुष आऱ्याचे कार्याचे गुरु आहेत.अशाप्रकारे जगात अनेक गुरु आहेत हे कोणीही काळ कसे मारावे हे सांगणारे सतगुरु नाही असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व स्त्री–पुरुषांशी बोलले.।।२५।।

**बेद गरू इण रोग का ।। ईद्याँ का गुरू भोग ।।**
**मन का गुरू तो ज्ञान हे ।। प्राणा का गुरू जोग ।।२६।।**

रोगाचा गुरु वैद्य आहे.इंद्रियांचा गुरु देहाचा भोग आहे.मनाचा गुरु ज्ञान आहे प्राण म्हणजे श्वासाचा गुरु योग आहे.अशाप्रकारे हद्दीचे अनेक गुरु आहेत हे आवागमनातून

मुक्त होण्याची विधी सांगणारे एक ही गुरु नाहीत असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले.।।२६।।

**सतगुरू बिन गुरू सो करो ।। कारज सरे न कोय ।।**
**जन सुखदेवजी केत हे ।। सुण लीज्यो सब लोय ।।२७।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले काळापासून मुक्त करुन देणाऱ्या सतगुरु शिवाय दररोजचे शंभर शंभर गुरु केले तरी ही मोक्षाला जाता येणार नाही.ही गोष्ट सर्व स्त्री-पुरुष ऐकू घ्या असे आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी जतविले.।।२७।।

।। इति हद गुरू पारख को अंग संपूरण ।।